महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : पाचवी

----------------------------------------------------------------------------------------------------

# समजपूर्वक वाचन

**अर्ज**

दि. १५ जानेवारी २०१५

प्रति

मा. मुख्याध्यापक,
मोरे विद्यालय,
साधनानगर- नांदेड

विषय :- सायकल मिळण्यासंदर्भात.

मा. सर,

मी सीमा गोरे, इयत्ता पाचवीत शिकत आहे. मी शाळेत नियमित येते आणि वेळेवर अभ्यास पूर्ण करते. शाळेकडून मिळालेली सायकल मी काळजीपूर्वक वापरीन. माझ्याकडे सायकल असेपर्यंत मी तिचा दुरुस्तीचा खर्च करीन. जेव्हा माझे शिक्षण पूर्ण होईल तेव्हा मी सायकल शाळेत जमा करीन. परस्पर कोणालाही देणार नाही. विकणार नाही. सुअवस्थेत परत करीन. सायकल मला मिळावी अशी विनंती.

आपली विद्यार्थिनी,
सीमा गोरे
इयत्ता- ५ वी

**प्रश्न :-**

१) अर्ज कशासाठी केला आहे?
२) अर्जात कोणत्या गोष्टीविषयी आश्वासन दिले आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

**गणिती भाषा**

संदर्भ :- किशोर: खंड -९

लेखक :- पा. पी. घरत

एक किलो वजनाचा एक मोठा बेडूक चोवीस तासांत एक किलो अन्न खातो. या भोजनात ४५ टक्के जीवजंतूंचा समावेश असतो. त्यापैकी बहुतांश किडे पिकावरील किडे असतात. बारीक जंतू पंधरा टक्के असतात. बेडूक अन्न खाताना उंदरांनाही खाऊन टाकतात. एवढेच नव्हे तर विंचूही खाऊन टाकतात पंचेचाळीस टक्के किडे म्हणजे जवळ जवळ चारशे ग्रॅम वजनाचे किडे झाले. त्याची संख्या पाहिली तर जवळ जवळ २५०० एवढी भरेल. अशा रीतीने एक बेडूक पिकाचे नुकसान करणाऱ्या २५०० किड्यांना रोज खाऊन टाकतो. पिकाचे रक्षण करतो.

बेडूक जलचर आणि स्थलचर असतात. एवढेच नव्हे तर काही बेडूक झाडावरही चढतात. ते आपल्या जीवनातील पाऊण भाग झोपेत व आरामात काढतात. तो आळशांचा राजा आहे. परंतु हा आळशी जीव माणसाचा फार उपयोगी आहे. शेतकऱ्यासाठी तर तो विश्वासू मित्र आहे. शेतात जेवढे पिकाचे दुश्मन आहेत त्या सर्वांचा बेडूक हा दुश्मन आहे. त्या कीटकांना स्वाहा करून माणसांवर तो केवढे उपकार करतो...!

**प्रश्न -**

१) मोठा बेडूक चोवीस तासांत किती अन्न खातो?

२) बेडकाच्या जेवणात किती टक्के जीवजंतू असतात?

३) बेडूक कोठे - कोठे राहतो? हे उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून समजते?

४) बेडकाला आळशांचा राजा का म्हटले आहे?

५) बेडूक कोणाचा दुश्मन आहे?

६) या उताऱ्यास योग्य शीर्षक दे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‌या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

**प्रतिसाद**

**टँकरचालकांना शिस्त लावावी**

यंदा पाऊस कमी पडल्यामुळे उस्मानाबादेत पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे शहरात बऱ्याच ठिकाणी टँकरने पाणी पुरविले जात आहे. मुख्य अहिल्याबाई होळकर पथावर पाणी भरण्याची सोय आहे. गेल्या काही महिन्यांपासून वाहतूककोंडी होत होती म्हणून दिशा बदलून पुढच्या बाजूने टँकर वळविण्यात आले ; परंतु पाणी भरून पुन्हा भगतसिंग चौकात यु वळण घेण्यासाठी सुमारे अर्धा किलोमीटर हे टँकर जातात त्यावेळी टँकरची झाकणे नीट न लावल्यामुळे पाणी सांडत जाते. त्यामुळे दुचाकी घसरतात त्यामुळे भगतसिंग चौकात सांडलेल्या पाण्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे टँकर चालकांना शिस्त लावावी.

गजानन वाघमोडे

उस्मानाबाद

**प्रश्न :-**

१) उस्मानाबादमध्ये पाणीटंचाई का निर्माण झाली?

२) टँकरची दिशा का बदलण्यात आली?

३) टँकरचालकांना कोणती शिस्त लावणे गरजेचे आहे?

४) अपघात टाळण्यासाठी काय करावे?

६) वरील प्रतिसाद कोणी दिला आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : पाचवी

---

**विनोद**

संदर्भ :- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास
लेखक :- अशोक निरफराके

| | | |
|---|---|---|
| एक शेजारी | - | “ कृपया तुमचा तंबोरा, पेटी आणि तबला आज मला द्याल? |
| दुसरा (उत्साहाने) | - | “ का? आज तुमच्याकडे मैफल आहे वाटते?” |
| पहिला | - | “ नाही! एक दिवस सुखाने झोपायचे आहे!” |

**प्रश्न -**

१) पहिल्या शेजाऱ्याने दुसऱ्याकडे काय मागितले?
२) हे मागण्यामागे त्याचा काय हेतू होता?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

**विनोद**

संदर्भ :- चिं. वि. जोशींचे निवडक विनोद

**मोटार प्रवास**

चिमणराव आपल्या मोटारीतून ऑफिसला जात असत. या प्रवासाचा हा एक अनुभव: " मी मोठ्या अभिमानाने सहकाऱ्यांना घेऊन ऑफिसला निघालो. कंपाऊंडात शिरलो; पण मोटार आज थांबण्याचे मनावर घेईना. काही केल्या इंजिन बंद होईना. पायब्रेक दाबला, हातब्रेक दाबला. वेग कमी केला, पण व्यर्थ! औटच्या फाटकातून बाहेर आणि इनच्या फाटकातून आत, असे करीत आम्ही गरगर फिरत होतो. ऑफिसच्या नोकराची आणि बघ्यांची पोर्चमध्ये गर्दी जमली. पेट्रोल संपले की गाडी थांबेल असा मला विश्वास होता ; पण त्यासाठी तीन तास थांबावे लागले असते. अखेर दिल्लीच्या साहेबांची ' ग्लोरीयान ट्रेन ' आमच्या फाटकातून आत शिरताना माझ्या मोटारीने तिच्या पार्श्वभागावर धडक दिली आणि थांबली. या अपघातात माझ्या मोटारीचे नाक चांगलेच सडकले. माझ्या कपाळाला टेंगुळ आले, अय्यरसाहेबांचा चष्मा फुटला आणि त्या दोघा कारकुनांच्या हिरड्या सुजल्या."

**प्रश्न -**

१) चिमणराव ऑफिसला कसे जात?

२) ऑफिसच्या पोर्चमध्ये बघ्यांची गर्दी का जमली होती?

३) दिल्लीच्या साहेबांची कोणती गाडी फाटकातून आत शिरली?

४) मोटारीच्या धडकेने कोणकोणत्या गोष्टी घडल्या?

---

**संवाद**

संदर्भ :- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास
लेखक :- अशोक निरफराके

मुलगा - (गंभीर चेहऱ्याने) आई गं, मी उद्यापासून रोज पहाटे उठणार आहे.

आई - हो का ?

मुलगा - आणि रोज दोन तास अभ्यास करणार आहे. आमच्या बाईंनी तसं वेळापत्रकच आखून दिलंय.

आई - शहाणं माझं बाळ ते.

मुलगा - मग आत्ता मी चिंटूकडे खेळायला जाऊ ?

**प्रश्न -**

१) मुलाने कोणत्या दोन गोष्टी करायच्या ठरवल्या होत्या ?
२) आईला खूश करण्यामागे मुलाचा हेतू काय होता ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‌या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

**कविता**

**कवी:-** विंदा करंदीकर

एका देवमाशाने गिळली बोट
डोंगराएवढे झाले पोट

देवमासा गेला डॉक्टरच्या घरी
म्हणाला पोटात "ढाराढुरी"

डॉक्टरने कापले त्याचे पोट
आणि बाहेर काढली बोट
मग डॉक्टर हसला मिशीत
देवमासा आला खुशीत

आणि म्हणाला घालीत कोट
फी साठी ठेवा बोट

प्रश्न :-

१) देवमासा डॉक्टरकडे का गेला?

२) देवमाशाच्या अवस्थेचे वर्णन कवीने कसे केले आहे?

३) डॉक्टरच्या फी विषयी कोणती गंमत कवितेत आहे?

४) या कवीतेचे कवी कोण आहेत?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : पाचवी

---

**माहितीपर लेख**

मुलांना आवडणारे एक गुरुजी होते. त्यांचे नाव रवींद्रनाथ टागोर. भारताच्या पूर्वेला कलकत्ता नावाचे एक शहर आहे. त्याच्याजवळ बोलपूर नावाच्या छोट्याशा गावी त्यांनी अनोखी शाळा सुरू केली. तिचे नाव शांतिनिकेतन. तिथे मुले आणि गुरुजी वर्गात बसत नसत. मोकळ्या आकाशाखाली, झाडाखाली वर्ग भरत. रवींद्रनाथ मुलांसाठी बंगाली भाषेत नाटके लिहीत. गाणी लिहीत. 'ढगाच्या मांडीवर ऊन हसतंय', 'आम्ही सगळेच राजे', 'वनावनात फाल्गुन आला', 'शेतात ऊनसावलीचा खेळ सुरू आहे' अशी कितीतरी गाणी त्यांनी लिहिली. अगदी छोट्या मुलांसाठी त्यांनी 'सहजपाठ' लिहिले. ते मुलांना फार आवडत, यात काय नवल!

प्रश्न :-

१) मुलांच्या आवडत्या गुरुजींचे नाव काय होते?
२) शाळेला अनोखी का म्हटले आहे, असे तुला वाटते?
३) मुलांना ते का आवडत असतील?
४) शिक्षकांच्या मदतीने भारताच्या नकाशात कलकत्ता शहर कुठे आहे ते बघ.
५) तुमचा वर्ग कधीतरी झाडाखाली भरवण्याबद्दल गुरुजींना चिठ्ठी लिही.